पुढारी

# विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेतील यश कौतुकास्पद

## कुलगुरू डॉ. शिर्के : विद्यापीठात विद्यार्थ्यांचा गौरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात अभ्यास करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेले यश कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यूजीसी पुरस्कृत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील विद्यार्थ्यांनी यश मिळवले. त्यांच्या गौरव समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या यशात शिवाजी विद्यापीठाचा महत्त्वाचा वाटा असल्याचे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन सदोदित लोकाभिमुख काम करण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. आलोक जत्राटकर, तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते.

सकाळ

# श्रीराम पवार यांच्या 'अस्वस्थपर्व'वर आज विद्यापीठात परिचर्चा

कोल्हापूर, ता. १६ : 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक व राजकीय विश्लेषक श्रीराम पवार यांच्या 'अस्वस्थपर्व' या पुस्तकावर उद्या (ता. १७) परिचर्चेचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभाग व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे ही चर्चा होईल. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील अर्थशास्त्र विभागाच्या सभागृहात दुपारी चारला हा कार्यक्रम होईल.




जगभरात सध्या धर्म-जात, वंशाच्या आधारावर बहुसंख्याकवाद बोकाळतो आहे आणि त्यातून अनेक प्रकारचे ताण निर्माण होऊ लागले आहेत. अस्वस्थ करणाऱ्या या अलीकडच्या काळातील जागतिक घडामोडींचे अगदी सोप्या भाषेत परखडपणे विश्लेषण करताना भविष्याचा वेध घेणारे हे पुस्तक आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत परिचर्चेला प्रारंभ होईल. ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर अध्यक्षस्थानी असतील. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार, आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक डॉ. रोहन चौधरी यांचा सहभाग असेल.

कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नितीन माळी यांनी केले आहे.

पुढारी

### शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाच्या

# ऑनलाईन जर्नालिझम अभ्यासक्रमास प्रवेश सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. पदव्युत्तर स्तरावरील एक वर्षाचा हा अभ्यासक्रम आहे.

ऑनलाईन जर्नालिझम अभ्यासक्रमात यु ट्यूब चॅनल, वेब पोर्टल, डेटा जर्नालिझम, मोबाईल जर्नालिझम, डॉक्युमेन्ट्री, शॉर्ट फिल्मस्, व्हिडिओ एडिटिंग, शूटिंग आदी विषयांचे ज्ञान दिले जाते. प्रात्याक्षिकांवर आधारलेल्या अभ्यासक्रमातून नोकरीसह स्वयंरोजगाराच्या अनेक संधी निर्माण होऊ शकतात. कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. अधिक माहितीसाठी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव (मो. ९८८११९१२२९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुण्यनगरी

# 'ऑनलाईन जर्नालिझम'साठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे सुरू असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. पदव्युत्तर स्तरावरील एक वर्षाचा हा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमात यूट्यूब चॅनल, वेब पोर्टल, डेटा जर्नालिझम, मोबाईल जर्नालिझम, डॉक्युमेन्ट्री, शॉर्ट फिल्मस्, व्हिडीओ एडिटिंग, शूटिंग आदी विषयांचे ज्ञान दिले जाते. प्रात्यक्षिकावर आधारलेल्या या अभ्यासक्रमातून नोकरीसह स्वयंरोजगाराच्या अनेक संधी निर्माण होऊ शकतात. अधिक माहितीसाठी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.